**Fermenta Biotech Limited** *(formerly known as DIL Limited)*
CIN: L99999MH1951PLC008485
Regd. Office: A - 1501, Thane One, DIL Complex, Ghodbunder Road, Majiwade, Thane (W) - 400 610, Maharashtra, India.
Tel. : +91-22-6798 0888 Fax. : +91-22-6798 0899
Email : info@fermentabiotech.com, Website. : www.fermentabiotech.com

Ref: F.No.: 49

July 19, 2022

**Corporate Relations**
**BSE Limited**
**Phiroze Jeejeebhoy Towers,**
**Dalal Street, Fort,**
**Mumbai – 400 001**

Dear Sirs,

**Sub.:** **Regulation 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ('Listing Regulations'): Newspaper Advertisement - Notice for 70th Annual General Meeting ('AGM') of the Company**

**Ref:** **Scrip Code: 506414**

Pursuant to Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, we herewith enclose the photocopy of the newspaper publication published in Sakal, Marathi on page no. 9 dated July 19, 2022, regarding the Notice of the 70th AGM of the Company.

Kindly take the same on record.

Thanking you,

Yours faithfully,
**For Fermenta Biotech Limited**

**Srikant Sharma**
**Company Secretary & Vice President (Legal)**
**Membership No. FCS3617**

Encl.: as above

मुंबईतील इंधन दर: पेट्रोल 106.35, डिझेल 96.52 | BSE 54,521.15 + 760.37 | NSE 16,27850 + 41.60 | USD 1$ ₹80.01 | EURO 1€ ₹81.37 | POUND 1£ : ₹ 95.89 | सराफ बाजार: सोने : ₹46,190 (२४कॅरेट, प्रति १० ग्रॅम) | चांदी : ₹56,000 (प्रति १ किलो) | अंडी : 590 (एनईसीसी) घाऊक बाजारातली (प्रति १०० नग)

# आता सुट्या वस्तूंवरही जीएसटी लागू

## खिशाला आणखी कात्री; नवीन रचनेतील तरतुदी मागे घेण्याचे आवाहन







मुंबई, ता. १८ : केवळ २५ किलोपर्यंतच्या पाकिटांवर जीएसटी आकारणी होईल आणि त्यापेक्षा जास्त वजनाच्या वस्तूंवर जीएसटी आकारणी नाही, असे स्पष्टीकरण आज केंद्रातर्फे देण्यात आले आहे. दरम्यान, जीएसटीसंदर्भातील नवीन तरतूद ही संभ्रम निर्माण करणारी विचित्र आहे. हा कायदा अत्यंत गोंधळाचा असून जीएसटी तज्ज्ञ आणि व्यापारी यांनाही या तरतुदी समजलेल्या नाहीत. त्यामुळे या तरतुदी मागे घ्याव्यात, असे आवाहन 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चर'चे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले आहे.

सीलबंद व लेबल लावलेल्या नॉनब्रँडेड अन्नपदार्थ व अन्नधान्य यांच्यावरही आजपासून पाच टक्के जीएसटी लागू करण्यात आला आहे. यावर ते बोलत होते. अन्नधान्य, खाद्यपदार्थ, दूध, पनीर, लस्सी या गोष्टी ग्राहकांना दररोज लागत असल्याने पाच टक्के जीएसटीमुळे ग्राहकांचे बजेट कोलमडून जाईल. त्यामुळे ही तरतूद सरकारने मागे घ्यावी, अशी मागणीही त्यांनी केली. यासंदर्भात हा केंद्र सरकारने काही मुद्द्यांबाबत स्पष्टीकरण दिले आहे ते पुढील प्रमाणे.

**प्रश्न : कशा स्वरूपातील खाद्यपदार्थांवर जीएसटी आकारला जाईल?**

**उत्तर :** पूर्वी कंटेनरमधील ब्रँडेड वस्तूंवरच जीएसटी आकारला जात होता.आता सीलबंद केलेल्या आणि लेबल लावलेल्या वस्तूंवरही जीएसटी आकारला जाईल. जी वस्तू कोणत्याही स्वरूपाच्या पॅकिजमध्ये ठेवली जाते, मग ती सीलबंद असो किंवा नसो, तिला सीलबंद वस्तू मानले जाईल.

**प्रश्न : यासाठी वजन मर्यादा आहे का?**

**उत्तर :** सीलबंद केलेल्या आणि लेबल लावलेल्या पॅकमधील २५ किलो किंवा २५ लिटरपर्यंतच्या वस्तू सीलबंद वस्तूंच्या व्याख्येत येतील. अशा सीलबंद वस्तूंचे वजन २५ किलोपेक्षा जास्त झाले तर त्यांवर जीएसटी आकारला जाणार नाही. ५० किलोच्या तांदळाच्या पोत्यावर जीएसटी आकारला जाणार नाही. मात्र कारखान्यातून दुकानदाराकडे आलेल्या अशा पोत्यात १० किलोची पाच सीलबंद पाकिटे असतील तर त्यावर जीएसटी आकारला जाईल. कारण ही दहा किलोची वेगवेगळी पाकिटे भिन्नभिन्न ग्राहकांना विकली जातील.

**प्रश्न : कोणत्या टप्प्यावर जीएसटी आकारला जाईल?**

**उत्तर :** अशा वस्तूंचा पुरवठा कोणत्याही व्यक्तीने केल्यावर जीएसटी लागू होईल, म्हणजे वितरकाला पुरवठा करणारा कारखानदार किंवा किरकोळ विक्रेत्याला पुरवठा करणारा वितरक/मध्यस्थ किंवा वैयक्तिक ग्राहकांना पुरवठा करणारा दुकानदार अशा कोणत्याही व्यक्तीने पुरवठा केल्यास जीएसटी लागू होईल. त्यानंतर कारखानदार किंवा घाऊक विक्रेता किंवा किरकोळ विक्रेता जीएसटीमधील 'इनपुट टॅक्स क्रेडिट' तरतुदींनुसार त्याच्या पुरवठादाराकडून आकारलेल्या जीएसटीवर 'इनपुट टॅक्स क्रेडिट'साठी पात्र असेल.

**प्रश्नः सुट्या स्वरुपातील विक्रीवर जीएसटी लागू होईल का?**

**उत्तर :** कोणत्याही कारणाने किरकोळ विक्रेत्याने अशा प्रकारच्या पॅकिजमधून सुट्या स्वरुपात पदार्थांची विक्री केली तर त्यावर जीएसटी आकारला जाणार नाही.

**प्रश्नः संस्थात्मक ग्राहकांना सवलत आहे का?**

**उत्तर :** औद्योगिक ग्राहक किंवा संस्थात्मक ग्राहकांच्या वापरासाठी सीलबंद केलेल्या वस्तूंचा पुरवठा या तरतुदीतून वगळण्यात आला आहे.

**प्रश्नः भातगिरणीसाठी कोणती तरतूद आहे?**

**उत्तर :** भातगिरणी चालविणारी व्यक्ति २० किलोची तांदळाची पॅकिट विकते. त्याने वजनमापे विषयक कायदे आणि नियम यांच्यानुसार या विक्री व्यवहारांसंदर्भात आवश्यक घोषणापत्र जमा केले नसले तरीही या विक्रीवर जीएसटी द्यावा लागेल.

## केंद्राकडे जीएसटी भरपाईची ३५ हजार कोटी रुपये थकबाकी

सकाळ न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली, ता. १८ : केंद्राकडे जीएसटी भरपाईपोटी राज्यांची जून महिन्याची ३५ हजार कोटी रुपयांहून जास्त रक्कम थकीत असल्याची माहिती केंद्र सरकारने आज संसदेत दिली. यामध्ये महाराष्ट्राची थबकाकी ४१८३ कोटी रुपये आहे.

जीएसटी परिषदेच्या बैठकीसंदर्भात लोकसभेत विचारण्यात आलेल्या प्रश्नाच्या लेखी उत्तरात अर्थ राज्य मंत्री पंकज चौधरी यांनी ही माहिती दिली. जीएसटी भरपाईसाठी केंद्राने कर्ज घेऊन २०२०-२१ या वर्षात १.१० लाख कोटी रुपये तर २०२१-२२ या वर्षात १.५९ लाख कोटी रुपये राज्यांना दिले. यानंतर ३१ मेपर्यंत राज्यांना देय असलेल्या थकबाकीचे ८६९१२ कोटी रुपये राज्यांना देण्यात आले होते. मे अखेरपर्यंतचे सर्व देणे संपले असून आता केवळ जून महिन्यातील भरपाई देय राहील, असेही सांगण्यात आले होते. त्यानुसार केंद्राकडे राज्यांची असलेली जून महिन्याची थकबाकी रक्कम ३५२६६ कोटी रुपये आहे.

चौधरी यांनी सांगितले, की भरपाईचा जून २०२२ पर्यंत संपुष्टात आलेला कालावधी वाढविण्याची मागणी जीएसटी परिषदेमध्ये काही राज्यांनी केली. मात्र घटनादुरुस्तीनुसार जीएसटी कायद्यामुळे राज्यांच्या महसुलामध्ये होणाऱ्या हानीची भरपाई करण्याची केंद्राची जबाबदारी पाच वर्षांसाठी आहे. त्यापार्श्वभूमीवर २८, २९ जूनला जीएसटी परिषदेच्या बैठकीमध्ये जीएसटी भरपाई उपकराचा कालावधी एक वर्षासाठी वाढविण्यात आला आहे.

### जीएसटी मागे घेण्याची केजरीवाल यांची मागणी

नवी दिल्ली : नव्याने लागू करण्यात आलेला वस्तू सेवा कर (जीएसटी) केंद्राने तातडीने मागे घ्यावा, अशी मागणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी केली आहे. ते म्हणाले की, केंद्राने खाद्यपदार्थ आणखी महाग केले आहेत. देशात जनतेला दिलासा देणारे दिल्ली हेच एकमेव राज्य आहे, असा दावा करून ते म्हणाले की, आम्ही आरोग्य, शिक्षण, पाणी, वीज, प्रवास आणि इतर मूलभूत सुविधा मोफत पुरवीत आहोत.

## दृष्टिक्षेपात

### टाटा नेक्सॉनची नवी ईव्ही प्राईम

मुंबई, ता. १८ : टाटा कार कंपनीने नेक्सॉन ईव्ही 'प्राइम'च्या लाँचची घोषणा केली. या कारबरोबरच टाटा मोटर्स सॉफ्टवेअर अद्ययावत करून देण्यात येणार असून, त्याद्वारे कनेक्टिव्हिटी, गाडीची कार्यक्षमता, ड्रायव्हिंग अनुभव अधिक चांगला येईल, असा दावा करण्यात आला आहे. नेक्सॉन ईव्ही प्राईममध्ये मल्टी-मोड रिजेन, रिजेनवर ऑटोमॅटिक ब्रेक लॅम्प ॲक्टिव्हेशन, क्रूझ कंट्रोल, इनडायरेक्ट टायर प्रेशर मॉनिटरिंग सिस्टिम, स्मार्ट स्विच इंटिग्रेटेड कनेक्टिव्हिटी आदी वैशिष्ट्ये दिली आहेत. या कारमध्ये ३०.२ किली व्हॅटची लिथियम-आयन बॅटरी, १२९ पीएस परमनण्ट-मॅग्नेट एसी मोटर दिली आहे.

### 'भारतीय बाजारपेठेत पोषक वातावरण'



मुंबई : वाहन विक्री क्षेत्रात सध्या जागतिक बाजारपेठेतील प्रमुख पाच देशांमध्ये भारतीय बाजारपेठेचादेखील समावेश असल्याची माहिती बीएमडब्ल्यू कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. २०२१ च्या आर्थिक वर्षात जवळपास १० टक्केहून अधिक दुचाकींची विक्री भारतीय बाजारपेठेत झाली आहे. सध्या जर्मनीत कंपनीकडून सर्वाधिक वाहनविक्री होत असून आगामी काळात जवळपास ५,१९१ गाड्यांची विक्री करण्याचे उद्दिष्ट कंपनीने आखले आहे.

### सुझुकीच्या 'एस प्रेसोला' नवा लूक

मुंबई : भारतीय बाजारपेठेत वाहन-विक्री क्षेत्रात सध्या स्पर्धा वाढली आहे. गेल्या पाच वर्षांत जवळपास नवीन वाहनांची भर पडत आहे. त्यात आता सुझुकीने 'एस प्रेसो' नव्या लूकमध्ये येणार आहे. कंपनीने तीन वर्षांपेक्षा कमी कालावधीत आतापर्यंत दोन लाखांहून अधिक वाहनांची विक्री भारतीय बाजारपेठेत केली आहे. त्यामुळे आगामी काळात ग्राहकांचा अधिक चांगला प्रतिसाद मिळेल, असे कंपनीचे सेल्स आणि मार्केटिंग विभागाचे सिनिअर एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर शशांक श्रीवास्तव यांनी सांगितले.



### अपस्किलसाठी ग्रेट लर्निंगचा पर्याय

बेंगळूरु, ता. १८ : भारतात उच्च शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या ग्रेट लर्निंग या 'एडटेक' कंपनीने वर्ल्ड युथ स्किल्स डेनिमित्त 'अपस्किलिंग फायनान्शियल इम्पॅक्ट' हा अहवाल नुकताच सादर केला. या अहवालातून म्युच्युअल फंड, सोने आणि निश्चित व्याज सिक्युरिटीज तसेच इतर मालमत्तांची तुलना केली असून, त्यातून आर्थिक प्रभावाचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे. अपस्किल असलेले व्यावसायिक १० वर्षांमध्ये त्यांच्या सहकाऱ्यांच्या तुलनेत वेतनात १.१ कोटीहून अधिक वेतन मिळवू शकतात, असा दावा करण्यात आला आहे.

## एचडीएफसी बँकेचा नफा ९५७९ कोटींवर

### गेल्या वर्षीच्या तुलनेत २१ टक्के वाढ

मुंबई, ता. १८ : खासगी क्षेत्रातील नामांकित बँक असलेल्या एचडीएफसी बँकेने एप्रिल ते जून तिमाहीत ९,५७९ कोटी रुपयांचा एकत्रित निव्वळ नफा नोंदवला आहे. गेल्या वर्षीच्या याच तिमाहीच्या तुलनेत ही वाढ २०.९ टक्के जास्त आहे.

बँकेने सोमवारी तिमाही निकाल जाहीर केले. बँकेचा तिमाहीतील महसूल २७,१८१ कोटी रुपये असून त्यात १९.८ टक्के वाढ झाली आहे. या तिमाहीत बँकेला १९,४८१ कोटी रुपये व्याजापोटी मिळाले. या रकमेतही गेल्या वर्षीच्या याच तिमाहीच्या तुलनेत १४.५ टक्के वाढ झाली आहे. बँकेच्या उपकंपन्या वगळता फक्त एचडीएफसी बँकेचा या तिमाहीतील निव्वळ नफा ९,१९६ कोटी रुपये (१९ टक्के वाढ) आहे. बँकेच्या ठेवी १६ लाख कोटींवर (१९.२ टक्के वाढ) गेल्या असून कर्जही १४ लाख कोटींवर (२१.६ टक्के वाढ) गेली आहेत. या तिमाहीत किरकोळ कर्जांमध्ये २१.७ टक्के; तर व्यापारी-ग्रामीण कर्जांमध्ये २८.९ टक्के वाढ झाली. कंपन्यांना दिलेली कर्जेही १५.७ टक्के वाढली.

**देशभरात ६,३७८ शाखा**

बेसिल तीन निकषांनुसार बँकेचा सीएआर (कॅपिटल ॲडिक्वसी रेशो) १८.१ टक्के असून ग्रॉस एनपीए १.२८ टक्के; तर नेट एनपीए कर्जांच्या ०.३५ टक्के आहे. बँकेच्या देशभरातील एकूण शाखांची संख्या ६,३७८ असून १८,६२० एटीएम केंद्रे आहेत. गेल्या बारा महिन्यांत बँकेने ७२५ शाखा उघडल्या असून २९ हजार नवे कर्मचारी नियुक्त केले.

### पर्यटकांसाठी व्हिएतनामचे 'फू कूक' बेट व्हिसामुक्त

मुंबई, ता. १८ : व्हिएतनाममध्ये पर्यटनाला चालना देण्यासाठी भारतीय पर्यटकांकरिता तेथील फू क्कोक बेटांसाठी व्हिसा निर्बंधमुक्त केल्याची माहिती 'व्हिएटजेट'चे व्यापार संचालक जय लिंगेश्वरा यांनी येथे दिली.

सप्टेंबरपासून मुंबई ते व्हिएतनाममधील दा नांग दरम्यान थेट विमानसेवा सुरू होईल. याद्वारे बाली, बँकॉक, क्वालालंपूर, सिंगापूर, सेऊल, टोकियो, तैपेई या ठिकाणीही थेट जाता येईल. फू क्कोक बेटांसाठीही सप्टेंबरपासून मुंबई-दिल्ली येथून थेट विमानसेवा सुरू होणार आहे, असेही ते म्हणाले. व्हिएटनामने कोविडशी संबंधित सर्व निर्बंध उठवले असल्याने केवळ ई-व्हिसा काढून पर्यटक तेथे येऊ शकतात. जागतिक हवाईवाहतूक क्षेत्राने भरारी घेतली आहे.

ताज्या बातम्यांसाठी पाहा... eSakal.com


**महाराष्ट्र शासन**

उप संचालक (दक्षिण) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरिवली यांचे कार्यालय
Tel. No. 02228860362 E-mail- ddssgnp@gmail.com

शासन निर्णय क्रमांक सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय संकीर्ण २७१५/प्र. क्र. १००/१३ दि. १७/१२/२०१६ च्या अनुषंगाने संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथे असलेल्या प्राणी संग्रहालय व बिबट अपंगालयात वन्यप्राण्यांची देखरेख व उपचार करणेकरीता तसेच वन्यप्राण्यांना आपत्कालीन परिस्थितीमध्ये बचावाकरिता रेस्क्यू ऑपरेशन करणेकरिता प्राणी संग्रहालय प्राधिकरण (CZA) यांचे नियमांप्रमाणे सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन या पदाच्या विवक्षीत कामाकरीता शासकिय/ निमशासकीय सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकाऱ्यांमधून नेमणूक करावयाची आहे. कर्तव्य/ जबाबदाऱ्या/ अनुभव/ अटी/ शर्ती/ अर्जाचा नमुना/ नियुक्ती कालावधी/ वेतन इत्यादीबाबतचा सविस्तर तपशील वनविभागाच्या www.mahaforest.gov.in व https://sgnp.maharashtra.gov.in या वेबसाईटवर अपलोड करण्यात आलेली आहे. सदर कामाच्या स्वरुपामध्ये आपत्कालीन परिस्थितीमध्ये वन्याप्राण्यांच्या बचावाकरीता रेस्क्यू ऑपरेशनदेखील अंतर्भुत असल्याकारणाने मुलाखतीच्या वेळी उमेदवाराची शारीरिक क्षमतादेखील विचारात घेण्यात येईल. तरी इच्छुक उमेदवारांनी सदर तपशील पाहून अर्ज करावे.

सही/-
उप संचालक (दक्षिण)
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान,
बोरिवली

ठिकाण : बोरिवली
दिनांक : १३/०७/२०२२



**झारखण्ड सरकार**
**ग्रामीण कार्य विभाग, मुख्य अभियंता का कार्यालय**
102, द्वितीय तल्ला, अभियंत्रण भवन, कचहरी रोड, राँची

ई–निविदा आमंत्रण सूचना

ई–निविदा संख्या:- 28/2022-23/RWD/JAMSHEDPUR दिनांक :- 18.07.2022

मुख्य अभियंता, ग्रामीण कार्य विभाग, झारखण्ड, राँची द्वारा निम्न विवरण के अनुसार e-procurement पद्धति से निविदा आमंत्रित की जाती है।

| क्र0 सं0 | आईडेन्टी फिकेशन संख्या / पैकेज संख्या | कार्य का नाम | प्राक्कलित राशि (रूपये में) अंक में | अक्षर में | कार्य समाप्ति की तिथि |
|---|---|---|---|---|---|
| 1. | RWD/ JAMSHEDPUR/ 01/2022-23 | एन0एच0–06 से दुधकुण्डी–लोधनबनी तक पथ निर्माण कार्य (लं– 5.600 कि0मी0) | 4,75,25,200.00 | चार करोड़ पचहत्तर लाख पच्चीस हजार दो सौ रू0 मात्र | 18 माह |
| 2. | RWD/ JAMSHEDPUR/ 02/2022-23 | देवली चौक नुवागाँव तक पथ निर्माण कार्य (लं– 2.280 कि0मी0) | 1,80,77,000.00 | एक करोड़ अस्सी लाख सतहत्तर हजार रू0 मात्र | 12 माह |
| 3. | RWD/ JAMSHEDPUR/ 03/2022-23 | जानेगोड़ा से लाटकूगोड़ा होते हुए नरवा मेन रोड तक पथ निर्माण कार्य (लं– 2.400 कि0मी0) | 1,79,45,100.00 | एक करोड़ उनासी लाख पैंतालीस हजार एक सौ रू0 मात्र | 12 माह |
| 4. | RWD/ JAMSHEDPUR/ 04/2022-23 | रूगड़ीसाई मुख्य पथ से रागड़ासाई होते हुए जानमडीह चौक तक सड़क निर्माण कार्य (लं– 2.300 कि0मी0) | 1,78,92,300.00 | एक करोड़ अठहत्तर लाख बानबे हजार तीन सौ रू0 मात्र | 12 माह |
| 5. | RWD/ JAMSHEDPUR/ 05/2022-23 | कमलपुर से हेंसागोड़ा ग्राम तक पथ निर्माण कार्य (लं– 2.270 कि0मी0) | 1,57,72,600.00 | एक करोड़ सनतावन लाख बहत्तर हजार छः सौ रू0 मात्र | 12 माह |

2. वेबसाईट में निविदा प्रकाशन की तिथि :– 28.07.2022
3. ई–निविदा प्राप्ति की अंतिम तिथि एवं समय :– 10.08.2022 अपराह्न 5.00 बजे तक।
4. (क) मुख्य अभियंता कार्यालय, ग्रामीण कार्य विभाग, अभियंत्रण भवन, कचहरी, राँची अथवा (ख) जिला नियंत्रण कक्ष, राँची अथवा (ग) जिला नियंत्रण कक्ष, जमशेदपुर में से किसी भी कार्यालय में निविदा शुल्क एवं अग्रधन की राशि जमा करने की तिथि :– 12.08.2022 पूर्वाह्न 10.00 बजे से अपराह्न 3.30 बजे तक।
5. निविदा खोलने की तिथि एवं समय :– 16.08.2022 पूर्वाह्न 11.30 बजे।
6. निविदा आमंत्रित करने वाले पदाधिकारी का नाम एवं पता:– मुख्य अभियंता, ग्रामीण कार्य विभाग, 102, द्वितीय तल्ला, अभियंत्रण भवन, कचहरी चौक, राँची, झारखण्ड, पिन– 834001
7. ई–निविदा प्रकोष्ठ का दूरभाष सं0 :– 0651–2207818
8. निविदा शुल्क झारखण्ड राज्य में अवस्थित भारतीय स्टेट बैंक / अन्य राष्ट्रीयकृत बैंक द्वारा निविदाकार के नाम / अकाउंट से ही निर्गत बैंक ड्राफ्ट के रूप में कार्यपालक अभियंता, ग्रामीण कार्य विभाग, कार्य प्रमण्डल, जमशेदपुर के पक्ष में एवं जमशेदपुर में भुगतेय होगा जो लौटाया नहीं जायेगा।

विस्तृत जानकारी के लिए वेबसाईट jharkhandtenders.gov.in में देखा जा सकता है।

नोडल पदाधिकारी
ई–प्रोक्युर्मन्ट सेल

PR.NO.273964 Rural Work Department(22-23):D



**PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION, Pimpri – 411018**
Health Department
RFP No. – PCMC/Health H.O./5/2022-23

NOTICE INVITING TENDER

1. RFP are hereby invited for **"Mechanical Street Sweeping of all roads above 18 Meters in PCMC area for Seven Years"** on PPP mode. The bidder shall have similar experience and shall have sound Financial and Technical strength. The bidder can bid for any number of packages. However, a single bidder will be awarded a maximum of only 1 packages out of total 4 packages. The detailed terms of References, Qualification Criteria are provided in the RFP Document RFP No. PCMC/Health H.O./5/2022-23. The tendering package details are presented below,

| Name of Work | Tendering Package | EMD (in Rs.) | Cost of Bid Document (in Rs.) |
|---|---|---|---|
| Mechanical Sweeping of all roads above 18 Meters in PCMC area for Seven Years | Package details – 1 – Southern side of Head Office – Ward ABDG | 10,31,000 | 34,000 |
| | Package details – 2 – Southern side of Head Office – Ward BDGH | 10,45,000 | 34,000 |
| | Package details – 3 – Northern side of Head Office – Ward CHE | 10,53,000 | 34,000 |
| | Package details – 4 – Northern side of Head Office – Ward ACF | 10,59,000 | 34,000 |

2. The RFP documents are available on website www.mahatenders.gov.in to the bidders.
3. The RFP document will be uploaded on the website on 19/07/2022. The other details will be available on website during the period of Bid Submission process.
4. Pre-bid meeting will be held on 25/07/2022 at 12:00 Hrs in Office of Commissioner, 4th Floor, PCMC Main Building, Pimpri – 18.
5. Right to reject any or all the Bids is reserved by the competent authority.
6. Last date of submission of Bid is 17/08/2022 up to 15:00 Hrs.

Sd/-

Advertisement No : 129

Commissioner
Pimpri Chinchwad Municipal Corporation
Pimpri - 411018



**फरमेंटा बायोटेक लिमिटेड**

कॉर्पोरेट आयडेन्टिफिकेशन नंबर : L99999MH1951PLC008485
नोंदणीकृत कार्यालय: ए-१५०१, ठाणे वन, 'डीआयएल' कॉम्प्लेक्स, घोडबंदर रोड, माजिवाडा, ठाणे (पश्चिम) – ४०० ६१०, महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी: +९१-२२-६७९८ ०८००/८८८, फॅक्स: +९१-२२-६७९८ ०८९९
ई-मेल: info@fermentabiotech.com • वेबसाईट: www.fermentabiotech.com

सूचना

याद्वारे सूचित करण्यात येत आहे की:

१. कंपनीची ७०वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') शुक्रवार, १२ ऑगस्ट, २०२२ रोजी दुपारी ४:०० वाजता (आयएसटी) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ('व्हिसी') किंवा इतर दृकश्राव्य ('ओएव्हिएम') माध्यमांद्वारे आयोजित केली जाईल. ३० मे, २०२२ या तारखेच्या एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेले कामकाज पार पाडण्यासाठी कोणत्याही सामाईक स्थळावर सभासद प्रत्यक्षात हजर न होता कंपनी कायदा २०१३ च्या अंतर्गत तयार करण्यात आलेले नियम ('कायदा'), कंपनीबाबींच्या मंत्रालयाच्या सर्क्युलर्स म्हणजेच जनरल सर्क्युलर नं. १४/२०२० दिनांकीत ८ एप्रिल, २०२० आणि नं. १७/२०२० दिनांकीत १३ एप्रिल, २०२०, सह लागू होणारी इतर जनरल सर्क्युलर नं. २०/२०२१ दिनांकीत ८ डिसेंबर, २०२१ आणि जनरल सर्क्युलर नं. ३/२०२२ दिनांकीत ५ मे, २०२२ ('एमसीए सर्क्युलर्स') बरोबर वाचण्यात येणारे सेबी ('लिस्टींग ऑब्लीगेशन्स ॲण्ड डिस्क्लोझर रिक्वायरमेन्ट्स) रेग्युलेशन्स, २०१५ ('लिस्टींग रेग्युलेशन्स') आणि सिक्युरीटीज ॲण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) सर्क्युलर सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी२/सीआयआर/पी/२०२२/६२ दिनांकीत १३ मे, २०२२, सह सर्क्युलर सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी२/सीआयआर/पी/२०२१/११ दिनांकीत १५ जानेवारी, २०२१, सर्क्युलर सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी१/सीआयआर/पी/२०२०/७९ दिनांकीत १२ मे, २०२० आणि लागू होणारी इतर सर्क्युलर्स ('सेबी सर्क्युलर्स') यांच्यामधील तरतुदींच्या अनुसार घेण्यात येणार आहे.

२. ज्या सभासदांचे इ-मेल आयडीज् कंपनी/डिपॉझिटरी पार्टीसिपन्ट्स यांच्याकडे शुक्रवार, १५ जुलै, २०२२ रोजी नोंदविलेले होते त्या सर्व सभासदांकडे एजीएमची सूचना आणि वित्तिय वर्ष २०२१-२२ चा कंपनीचा वार्षिक अहवाल ('वार्षिक अहवाल २०२१-२२') यांच्या इलेक्ट्रॉनिक प्रती पाठवून देण्यात येतील. एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवाल २०२१-२२ च्या छापील प्रती पाठविण्याची गरज एमसीए सर्क्युलर्स आणि सेबी सर्क्युलर्स अनुसार अनावश्यक ठरवण्यात आली आहे.

३. एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवाल २०२१-२२ हे कंपनीची वेबसाईट www.fermentabiotech.com, बीएसई लिमिटेडची वेबसाईट www.bseindia.com आणि कंपनीचे रजिस्ट्रार ॲण्ड ट्रान्सफर एजंट, लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ('आर ॲण्ड टी एजंट'/'एलआयआयपीएल') यांची वेबसाईट https://instavote.linkintime.co.in वर देखील उपलब्ध आहेत.

४. **ई-मेल ॲड्रेसेस/बँक खात्याची माहिती नोंदविण्याची पध्दत :** छापील स्वरूपात भागधारणा असणाऱ्या आणि/किंवा ज्यांनी आपले ई-मेल ॲड्रेसेस कंपनी आणि/किंवा एलआयआयपीएल कडे नोंदविलेले/अद्ययावत केलेले नाहीत आणि ज्यांनी इलेक्ट्रॉनिक क्लिअरींग सर्व्हिस (ईसीएस)द्वारे त्यांच्या बँक खात्यांमध्ये लाभांश थेट मिळविण्यासाठी त्यांच्या बँक खात्यांचे तपशील नोंदविलेले/अद्ययावत केलेले नाहीत, अशा भागधारकांना विनंती करण्यात येत आहे की ते एलआयआयपीएलकडे नोंदवावेत. अशा भागधारकांनी फोलिओ क्र. व भागधारकाचे नाव, ओळखीच्या पुराव्याची स्वयंप्रमाणित प्रत, पत्त्याच्या पुराव्याची स्वयंप्रमाणित प्रत, (नोंदवावयाचा/अद्ययावत करावयाचा असल्यास) ई-मेल ॲड्रेस आणि (बँक खात्याची माहिती) नोंदवायची/ अद्ययावत करावयाची असल्यास) रद्द केलेली धनादेश पत्रिका या गोष्टी नमूद करून व्यवस्थित भरलेले व सही केलेले विनंतीपत्र rnt.helpdesk@linkintime.co.in वर ई-मेल करावे किंवा प्रत्यक्ष दस्तऐवज लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, सी-१०१, २४७ पार्क, एलबीएस मार्ग, विक्रोळी, पश्चिम, मुंबई - ४०००८३, महाराष्ट्र, भारत येथे पाठवून द्यावे, अशी विनंती करण्यात येत आहे. डि-मटेरिअलाइज्ड स्वरूपात भागधारणा असणाऱ्या आणि वरील माहिती नोंदविण्याची/अद्ययावत करण्याची इच्छा असणाऱ्या सभासदांना विनंती करण्यात येत आहे की त्यांनी सदर माहिती त्यांचे संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपन्ट्स यांच्याकडे देखील नोंदवावी/अद्ययावत करून घ्यावी.

५. **छापील स्वरूपात भागधारणा असणाऱ्या सभासदांसाठी ई-मतदानाची पध्दती :** भागधारक ज्यांची छापील स्वरूपात भागधारणा आहे किंवा ज्यांनी त्यांचे ई-मेल ॲड्रेसेस कंपनीकडे नोंदविलेले नाहीत अशा सभासदांकडून रिमोट ई-व्होटींगद्वारे अथवा एजीएमच्या ठिकाणी ई-व्होटींग प्रणालीद्वारे मतदान करण्याची पध्दत एजीएमच्या सूचनेमध्ये दिलेली असेल.

६. **इलेक्ट्रॉनिक क्लिरींग सर्व्हिस (इसीएस) किंवा इतर कोणत्याही पद्धतीद्वारे थेट बँक खात्यामध्ये लाभांश जमा करण्यासाठी अधिकार देण्याची पद्धती:** संचालक मंडळाने ३० मे २०२२ रोजी घेतलेल्या आपल्या सभेमध्ये प्रत्येकी रु. ५ च्या प्रत्येक समभागासाठी रु. १.२५ एवढ्या अंतिम लाभांशाची शिफारस केली आहे. त्याला एजीएम मध्ये एकदा मंजुरी मिळाली की शुक्रवार, ५ ऑगस्ट २०२२ रोजी ('नोंदणीची तारीख') ज्यांची नावे रजिस्टर ऑफ मेंबर्समध्ये दिसून येत आहेत अशा शेअर होल्डर्स/बेनिफिशल ओनर्स २२ ऑगस्ट २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी ज्यांनी आपल्या बँक खात्याची माहिती कंपनी/एलआयआयपीएलकडे सादर केली असेल अशा भागधारकांना इलेक्ट्रॉनिक ट्रान्सफरद्वारे पैसे देण्यात येतील. ज्यांनी आपल्या इसीएस मॅन्डेट्सची नोंदणी केली नसेल अशा भागधारकांकडे छापील लाभांशपत्रे पाठवून देण्यात येतील. कंपनीला भागधारकांच्या संबधित बँक खात्यांमध्ये वेळचेवेळी लाभांश जमा करता यावा यासाठी भागधारकांनी त्यांच्या डिमॅट खात्याशी संलग्न बँकखात्याशी निगडीत आवश्यक सोपस्कार पूर्ण करावेत अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे. छापील स्वरुपात भागधारणा असणाऱ्या भागधारकांना विनंती करण्यात येत आहे की कंपनीच्या वेबसाईट https://fermentabiotech.com/investor-service-requests.php वर उपलब्ध असणाऱ्या आयएसआर-१ आणि इतर संबधित अशा विहित नमुन्यातील फॉर्म्समधून त्यांनी एलआयआयपीएल कडे आपले केवायसी अद्ययावत करुन घ्यावेत. डिमटेरिअलाइज्ड पध्दतीने भागधारणा असणाऱ्या भागधारकांना त्यांच्या संबधित डिपॉझिटरी पार्टीसिपन्ट्स ('डिपी') कडे माहिती सादर करण्याची विनंती करण्यात येत आहे.

७. वित्तिय कायदा २०२० च्या तरतुदींबरोबर वाचण्यात येणाऱ्या आणि दुरुस्त करण्यात आलेल्या आयकर कायदा, १९६१ अनुसार १ एप्रिल, २०२० पासून प्रभावी होणारा कंपनीकडून जाहीर करण्यात आलेला आणि भागधारकांना देण्यात येणारा लाभांश हा करपात्र आहे. त्यामुळे कंपनीने भागधारकांना देण्यात आलेल्या लाभांशांमधून लागू होणाऱ्या दराने स्त्रोतस्थानी ('टीडीएस') कराची वजावट करणे आवश्यक आहे. ह्या कराच्या तरतुदींच्या अनुसार भागधारकाची निवासी स्थिती आणि कंपनीकडे सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांच्यानुसार टीडीएसच्या दरामध्ये बदल होऊ शकतो. भागधारकांच्या विविध प्रकारांसाठी आवश्यक कागदपत्रांसह असणाऱ्या टीडीएसच्या तरतुदी एजीएमच्या सूचनेमध्ये कळविण्यात येतील.

८. या संदर्भात भागधारकांना एजीएमच्या सूचनेमधील नोंदी काळजीपूर्वक वाचाव्यात अशी विनंती आहे. ई-व्होटींग विषयी कोणत्याही शंका असल्यास कृपया https://instavote.linkintime.co.in वर हेल्प सेक्शन खाली उपलब्ध असणारे वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यूज) आणि इन्स्टाव्होट ई-व्होटींग मॅन्युअल पहावे अथवा enotice@linkintime.co.in वर ई-मेल पाठवावा अथवा इन्स्टाव्होट सपोर्ट डेस्क, लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्याशी दूरध्वनी क्र. ०२२-४९१८ ६००० वर संपर्क साधावा अशी विनंती करण्यात येत आहे.

संचालक मंडळाच्या आज्ञेवरून
फर्मेन्टा बायोटेक लिमिटेड करिता
सही/-
श्रीकांत एन शर्मा
व्हाइस प्रसिडेन्ट (लिगल) आणि कंपनी सेक्रेटरी

दिनांकीत: १४ जुलै, २०२२
स्थळ: ठाणे

FBL / 54 / PREM ASSOCIATES - MAR